210/6943 पावती Original/Duplicate

Tuesday,November 11 ,2025 नोंदणी क्रं. :39म

2:54 PM Regn.:39M

पावती क्रं.: 9944 दिनांक: 11/11/2025

गावाचे नाव: वडगाव माहोरे

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: अरन1-6943-2025

दस्तऐवजाचा प्रकार : खरेदीखत

सादर करणाऱ्याचे नाव: सचिन शंकरलाल चौधरी

नोंदणी फी	रु. 3000.00
दस्त हाताळणी फी	रु. 680.00
पृष्ठांची संख्या: 17	
एकूण:	रु. 3680.00

मुळ दस्तऐवज परत दिला

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 3:14 PM ह्या वेळेस मिळेल.

सह दु.नि.अमरावती 1

(सुनिल वाडेवाले)
सह दुय्यम निबंधक
अमरावती-१

बाजार मुल्य: रु.147015 /-

मोबदला रु.300000/-

भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 18000/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.680/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1125116703056 दिनांक: 11/11/2025
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.3000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH011356261202526E दिनांक: 11/11/2025
बँकेचे नाव व पत्ता:

अ-ई-ण-१
६९८३ /८-१०
२०२५

स्थावर मालाचे (खुल्या प्लॉटचे) खरेदीखत

मौजे - वडगावं (माहोरे), वि.क्र. ९.४, दर रु. १६७०/- प्रति चौ.मी.

शासकिय किंमत रु. १,५१,६००/-

शासनाच्या नियमानुसार मुद्रांक शुल्क लावलेले आहे.

एकूण मुद्रांक शुल्क रु. १८,०००/-, नोंदणी फी रु. ३,०००/-

स्थावर मालाचे खरेदीखत किंमत रु. ३,००,०००/- (रु. तीन लक्ष फक्त)

<u>लिहून घेणार</u> :- **सचिन शंकरलाल चौधरी,** वय - २८ वर्ष, धंदा - नोकरी,
आधार नं. ५००४ ४१९८ ५९३८
मो. नं. ८००७९११५५१
रा. परसपुर ता., जि. अमरावती - ४४४८०८, यांसी,

<u>लिहून देणार :-</u> **नैनिश देवेंद्र बोबडे,** वय- २९ वर्षे, धंदा- शेती,
आधार नं. ७९३८ ०३१४ ९२०९
मो. नं. ९८९०९३१६९६
रा. रासेगावं - ४४४८०६, ता. अचलपुर, जि. अमरावती.

इ.सन २०२५ साल कारणे स्थावर मालाचे (खुल्या प्लॉटचे) खरेदीखत लिहून देतो ते येणेप्रमाणे -

१. **<u>मिळकतीचे वर्णन</u>** :- "नोंदणी पोट तुकडी अमरावती **ग्रामीण** कचेरीचे कक्षेतील व जि.प. अमरावतीचे हद्दीतील **मौजे - वडगावं (माहोरे),** ता.जि. अमरावती येथील **शेत भुमापन क्र. १३७/१,** एकुण क्षेत्रफळ १ हे. २१ आर, **शेत भुमापन क्र. १३८/१,** एकुण क्षेत्रफळ ० हे. ७१ आर, **शेत भुमापन क्र. १४१**, एकुण क्षेत्रफळ २ हे. ६५ आर, **शेत भुमापन क्र. १४२**, एकुण क्षेत्रफळ १ हे. ९४ आर, **शेत भुमापन क्र. १४५/१,** एकुण क्षेत्रफळ १ हे. ८२ आर, **शेत भुमापन क्र. १४८**, एकुण क्षेत्रफळ १ हे. ४५ आर, अशा सर्व जमिनी एकमेकालगत असून यांचे एकत्रीत क्षेत्रफळ ९ हे. ७८ आर जमिनीचे मा. सहाय्यक संचालक नगर रचना, मुल्यनिर्धारण विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.जा.क्र:अकृषक/ मौ. वडगांव माहोरे /ता. व जि. अम/ ग.नं. १३७, १३८, १४१, १४२, १४५ व १४८/ ससंनर-अम/५७०, दि. १५.०३.२०२४ अन्वये मंजुर केलेले व मा. तहसिलदार साहेब, अमरावती यांचे फाईलवरील रा.मा.क्र. एन.ए.पी.३४/वडगांव माहोरे /१६३/२०२३-२४, नि.ता. २०.०३.२०२४ नुसार निवासी प्रयोजनार्थ अकृषक रुपांतरीत झालेल्या व **कान्हा नगरी** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अभिन्यासातील **लेआऊट प्लॉट क्र. २९७ (दोनशे सत्यान्नऊ)** (संगनीकृत ७/१२ प्रमाणे भूमापन व उपविभाग क्र १३७ ते१३८/१/१४१/१४२/१४५/१/१४८/२९७), याची साईज मंजुर नकाशाप्रमाणे **६.०५x१५ मि.** असून याचे **एकुण क्षेत्रफळ ९०.७५ चौ.मि. (९७६.८३ चौ.फुट)** आहे. याची चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

६८४३ /५-१८
२०२५

पुर्वेस - लेआऊट मधील ९ मि. रुंदीचा रोड,
पश्चिमेस - लेआऊट प्लॉट क्र. २८६,
उत्तरेस - लेआऊट प्लॉट क्र. २९६,
दक्षिणेस - लेआऊट प्लॉट क्र. २९८ ...."

(उपरोक्त नमुद चतु:सिमेतील खुला प्लॉट हा या खरेदीखताचा विषय असून याला यापुढे सदर्हु / सदर मिळकत म्हणून संबोधित केलेले आहे.)

२. सदर्हु मिळकतीसह इतर मिळकत ही मी दि. १०.१२.२०२४ रोजी, दस्त अ.क्र. ११११९, अमरावती ग्रामिण वर नोंदविलेल्या खरेदीखतान्वये विजय असोसिएट्स तर्फे प्रोप्रायटर - श्री रिषी धनराज खंडेलवाल यांच्या कडुन माझ्या स्वकष्टाने अर्जित रकमेतून विकत घेतली, तेव्हापासून सदर्हु मिळकत ही सरकारी अभिलेख व हक्क नोंदणीच्या अभिलेखामध्ये माझ्याच नावाने नोंदविण्यात आलेली आहे व सदर्हु मिळकतीवर माझी एकमेव मालकी व अबाधित ताब्यात आहे. मला सदर्हु मिळकत माझ्या मर्जीनुसार विकण्याचा पुर्ण अधिकार असून माझ्याशिवाय सदर्हु मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा हितसंबंध नाही.

३ सदर्हु मिळकत ही रिकाम्या स्वरुपाची असल्याने याचा कोणताही उपभोग घेऊ शकत नाही, शिवाय काही उत्कृष्ट वैयक्तिक कारणास्तव सदर मिळकत योग्य बाजार भावाने विकणे ही माझी आवश्यकता आहे व तुम्ही उचित बाजारभाव देऊ केल्यामुळे व हा सौदा मला व माझ्या कुटूंबाच्या संप्रदाला लाभप्रद असल्यामुळे सदर मिळकत मी तुम्हास या खरेदीखतान्वये नेहमीकरिता हस्तांतरित केलेली आहे.

४. **<u>भरणा</u> :-** सौदा किंमतीचा संपूर्ण भरणा रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लक्ष) मला तुमच्याकडून खालीलप्रमाणे मिळाला :-

रक्कम	**विवरण**
३०,०००/-	(अक्षरी तीस हजार रुपये) दि. ३०.१०.२०२५ रोजीचे ऑनलाईन ज्याचे युटीआर क्र. ७८९२५०१३०३२४, एच.डी.एफ.सी. बँक, शाखा व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती व्दारे मिळाला.
२,७०,०००/-	(अक्षरी दोन लक्ष सत्तर हजार रुपये) चा चेक क्र. ३४००४४ दि. १०.११.२०२५ रोजीचा, पंजाब नॅशनल बँक, शाखा ई.सी.ई. हाऊस, कस्तुरबा गांधी मार्ग, नई दिल्ली व्दारे मिळाले.
३,००,०००/-	**अक्षरी - तीन लक्ष रुपये**

वरीलप्रकारे मला तुमचे कडून भरण्याची संपूर्ण रक्कम मिळाली. सदर्हु रक्कम रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लक्ष रुपये) मिळाल्याची पावती मी या लेखान्वये देत आहे. भरणासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. वर दिलेले चेक बँकेकडून कोणत्याही कारणाने वटविल्या न गेल्यास हे खरेदीखत कोणतीही पुर्व सुचना न देता आपोआप समजण्यात येईल. दिलेले चेक बँकेकडून वटविल्या गेल्यानंतरच प्लॉटचा ताबा देण्यात येईल.

अ-र-ण-१
६९४३/६-१७
२०२५
३

५. वरील रक्कमेच्या मोबदल्यात मी तुम्हास सदर्हु मिळकत अक्षयीकरिता विक्री करुन दिली असून आजपासून तुम्ही सदर्हु मिळकतीचा संपूर्ण व एकमेव मालकी हक्काने वंशपरंपरा हवा तसा उपभोग घ्यावा अगर मर्जीनुरुप विल्हेवाट करावी. सदर्हु मिळकत मी आजच जागेवर मोजमाप करुन तुमचे प्रत्यक्ष ताब्यात दिली आहे व तुम्ही प्रत्यक्ष ताबा (Vacant Possession) घेतला आहे.

६. सदर्हु मिळकत मी यापुर्वी दुसरे कोणासही अन्य लेखान्वये लिहून दिली नाही. तसेच सदर्हु मिळकतीवर माझे खेरीज इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही. यावर इतर कोणाचाही गहाण, बोजा, ताबा, कर्ज, हक्क, हितसंबंध, कोर्ट कचेरी वाद, कुळ, जप्ती, वारसा, मोजमाप, वगैरेची भानगड नाही, तसे काही निघाल्यास व तुमचे मालकी हक्कास, उपभोगास व ताब्यास बाधा आल्यास मी जबाबदार राहील व तुम्हाला होणारी नुकसानी माझे इतर इस्टेटीतून भरुन देईल. तुम्हास तोषिस खर्च लागू देणार नाही.

७. सदर्हु मिळकतीस लागू असलेले सर्व प्रकारचे इजमेंटचे हक्क, सोई, सुविधा, जाण्याचे येण्याचे हक्कासह मागील व पुढील सर्व हक्क व अधिकार देखील मी याच खरेदीखतान्वये तुम्हास हस्तांतरित करुन देत आहे. या खरेदीखताचे आधारे तुम्ही सरकारी हक्क नोंदणी रेकॉर्डमध्ये सदर मिळकतीसंबंधी मालकी हक्काचे फेरफार परभारे तुमचे नावे नोंदवून घ्यावेत. त्यास माझी मुळीच हरकत नाही. गरज पडल्यास संबंधित प्राधिकाऱ्यासमक्ष मी स्वतः हजर राहून संमती देईल.

८. सदर्हु मिळकतीस लागू असलेले सर्व प्रकारचे सरकारी, निमसरकारी कर, अकृषक कर, देयके किंवा कोणत्याही स्थानिय प्रशासनाचे इतर कोणतेही कर अथवा देणे वगैरे या खरेदीखताच्या तारखेपावेतो काही निघाल्यास हे सर्व भरण्याची जबाबदारी माझ्यावर राहील. तुम्हाला यापैकी कोणतेही देणी अथवा कर भरण्याची गरज नाही. आजपासून लागू होणारे सर्व कर, देयके वगैरे भरण्याची जबाबदारी तुमचेवर राहील. लेआऊट मधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता झालेली आहे.

९. सदर दस्तातील व्यवहार हा निव्वळ खरेदीखताचा असून कोणत्याही व कसल्याही प्रकारे व्याजाचा किंवा सावकारी नाही.

१०. खरेदीला लागणारे मुद्रांक शुल्कासह खरेदीचा व नोंदणीचा संपूर्ण खर्च तुमच्याकडे लागू होते व ते फक्त तुम्हीच केलेला आहे.

११. सदर्हु मिळकतीच्या वर्णनात काही चुक किंवा जाणीव, किंवा त्रुटी राहिल्यास त्याचे या खरेदीखताचे वैधतेवर कोणतेही परिणाम होणार नाही व तुमचे सदर्हु मिळकतीवरील मालकी हक्क अबाधित राहील. गरज पडल्यास मी चुक दुरुस्ती लेख करुन देईल.

१२. सदर्हु मिळकतीसंबंधी दि. १०.१२.२०२४ रोजी, दस्त अ.क्र. ११११९, दु.नि. अमरावती ग्रामीण वर नोंदविलेल्या खरेदीखतान्वये मला प्राप्त झालेले सर्व सोई-सुविधा, सर्व मागील व पुढील हक्क व अधिकार वगैरे, (जे काही या खरेदीखतामध्ये अनावधने

६९८३/७-९७
२०२५

नमुद करण्याचे राहून गेले असेल ते सर्व हक्क) याच खरेदीखतान्वये तुम्हाला हस्तांतरित करुन बहाल करीत आहे.

हे खरेदीखत मी राजीखुशीने व सावध असतांना आज दि. ११.११.२०२५ रोजी अमरावती येथे वाचून समजून लिहून दिले आहे व ते मला व माझे इस्टेट वारसांस लागू व बंधनकारक असे.

टंकलेखन - रोहित एस. ब्रिजवे, अमरावती

लिहून घेणार चे संपूर्ण नांव :- **सचिन शंकरलाल चौधरी**

पासपोर्ट फोटो	**डाव्या अंगठ्याचा ठसा**	**स्वाक्षरी**
		Chaudhari

लिहून देणार चे संपूर्ण नांव :- **नैनिश देवेंद्र बोबडे**

पासपोर्ट फोटो	**डाव्या अंगठ्याचा ठसा**	**स्वाक्षरी**

साक्षीदार क्र. १ : **गणेशराव विष्णुपंत खवले**

आयडी पुरावा / क्र. : आधार नं. ६९०५ ४७९६ १५९५

सही :

साक्षीदार क्र. २ : **योगेश श्रीकृष्णराव यावले**

आयडी पुरावा / क्र. : आधार नं. ६०२४ ४१९३ ५४४९

सही : Y.S.Y